4

छाननी समिती प्राधान्य

जाक्र/जिप/मग्रारोहयो-4/कावी/789/2018
जिल्हा परिषद, परभणी.
दिनांक - ' /11/2018.
18/12/18

प्रति,
**गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती,पुर्णा.

**विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत छाननी समितीकडुन प्राप्त प्रस्तावा बाबत.**

**संदर्भ :-** 1.शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-2010/प्रक्र.47/राहयो-10 मंत्रालय मुंबई-32 दि.17.06.2016.
2. शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-2010/प्रक्र.34/राहयो-10 मंत्रालय मुंबई-32 दि.29.08.2017.
3.गट विकास अधिकारी,पंचायत समिती, **पुर्णा** यांचे पत्र जाक्र/पंसपु/MREGS/ कावि/531/2018 दि.29.10.2018.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-2010/प्रक्र.47/राहयो-10 मंत्रालय मुंबई-32 दि.17.06.2016. मध्ये नमुद केले नुसार औरंगाबाद विभागातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देणे पुर्वी संबंधित तालुक्याचे उप विभागीय अधिकारी,महसुल यांचे अध्यक्षते खालील छाननी समिती ने प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मान्यता देण्यास सहमतीचे आदेश द्यावयाचा आहेत. हे आदेश प्राप्त झाल्या नंतरच संबंधित कार्यक्रम अधिकारी (गट विकास अधिकारी/तहसिलदार) यांना प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करता येते. तसेच कामांचा यादीस सहमती दर्शविण्या पुर्वी अशा कामांची सर्वसाधरण छाननी करुन शासनाचा प्रचलित नियमा नुसार प्रशासकीय मान्यता होत असल्याचे तपासुन घेईल.

उप विभागीय अधिकारी यांच्या सहमतिने शिफारस केलेल्या यादीस प्रस्तावित कामांचा शेल्फ बनवितांना अंतिम मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरी ने द्यावी असे शासन निदेश आहेत. संदर्भ क्र.2 अन्वये छाननी समितीस पुढील 1 वर्षाच्या कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

सबब, गट विकास अधिकारी,पंचायत समिती, **पुर्णा** यांचेकडुन संदर्भ 3 नुसार छाननी समितीचे अध्यक्षांनी कामांची यादी मान्य करुन शिफारस केलेल्या प्रस्तावित यादीस कामांचे शेल्फ बनविण्यासाठी खालील अटींचा अधिन राहुन अंतिम मान्यता देण्यात येत आहे.

1. शासनाचे प्रचलीत शासन निदेशा नुसार सर्व तांत्रिक बाबींचे छाननी समितीने छाननी करावे.
2. वैयक्तिक लाभांचा कामांची निवड शासन निदेशा नुसार असल्याचे छाननी समितीने तपासावे.
3. अनुज्ञेय काम आराखडयात समाविष्ट असल्याची खात्री करावी. तसेच काम करणाऱ्या यंत्रणेची खात्री करावी.
4. कामाचे ठिकाणा बाबत (गट क्र.) व स्थळ दर्शक नकाशा याची छाननी करावी.
5. एकच काम दुबार होणार नाही याची खात्री करावी.
6. या पुर्वीचे अपूर्ण कामा बाबत प्रचलित शासन निदेशाचे पालन होत असल्याची खात्री करावी.
7. संबंधित कामाच्या अनुषंगाने प्रचलित सर्व शासन निदेशाची पालन होत असल्याची खात्री करावी.
8. प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी प्रचलित सर्व शासन निर्णय, शासन परिपत्रक व पत्रांचे पालन करुनच कार्यवाही करावी.
9. शासन निर्देशा प्रमाणे Geotagging बाबत संबंधितांना सुचना द्याव्यात.
10. **खालील प्रमाणे नमुद सर्व ग्रामपंचायत मध्ये सन 2018-19 या वर्षात अकुशल : कुशल प्रमाण 60:40 राखणेचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे.प्रमाण राखले गेले नाही तर गट विकास अधिकारी व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल.**

| विहिर पुनर्भरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | लाभधारकाचे नाव | ग्रामपंचायतचे नाव | कामाचे नाव | गट क्रमांक | शेरा |
| 1 | नारायन नागोराव जाधव | कलमुला | विहिर पुनर्भरण | 51 | |
| 2 | साहेबराव रंगनाथ उटकर | कलमुला | विहिर पुनर्भरण | 34 | |
| 3 | संभाजी सोपान उटकर | कलमुला | विहिर पुनर्भरण | 97 | |
| 4 | तुकाराम हिरामन गजभारे | कलमुला | विहिर पुनर्भरण | 44 | |
| 5 | नागोराव गोविंदराव लेंडगे | कलमुला | विहिर पुनर्भरण | 49 | |
| 6 | लिंबाजी दौलत लेंडगे | कलमुला | विहिर पुनर्भरण | 9 | |
| 7 | दत्तात्रय शरनप्पा रानरूबे | कलमुला | विहिर पुनर्भरण | 115 | |
| 8 | माधव नागोराव जाधव | कलमुला | विहिर पुनर्भरण | 82 | |
| 9 | सुरेश भाउराव वैद्य | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 26 | |
| 10 | गोविंद महादू पवार | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 88 | |
| 11 | कामाजी नारायन वैद्य | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 123 | |
| 12 | शे.तकबीर शे.कबीर | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 68 | |
| 13 | विकम नागोराव क्षिरसागर | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 82 | |
| 14 | यशवंत सखाराम हिवले | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 53 | |
| 15 | गंगाराम यशवंता वाघमारे | आजदापुर | विहिर पुनर्भरण | 14 | |
| 16 | राम बापुराव आवरगंड | माखणी | विहिर पुनर्भरण | 143 | |
| 17 | रमेश आप्पाराव आवरगंड | माखणी | विहिर पुनर्भरण | 266 | |
| 18 | विष्णू बालासाहेब आवरगंड | माखणी | विहिर पुनर्भरण | 291 | |
| 19 | ज्ञानोबा रमेश आवरगंड | माखणी | विहिर पुनर्भरण | 266 | |

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद,परभणी

**जिल्हाधिकारी**
परभणी

**प्रतिलीपी,**

1.अध्यक्ष (छाननी समिती) तथा उप विभागीय अधिकारी,..................... यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

2.उपजिल्हाधिकारी (रोहयो),परभणी यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.

3.तहसिलदार.................. यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

स्वा/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद,परभणी

स्वा/-
**जिल्हाधिकारी**
परभणी